# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART - TWO


(असाधारण)

**सोमवार, दि. ६ एप्रिल, २०१५**

**अधिसूचना**

क्र. ३०/२०१५ दिनांक : ६.४.२०१५

**विषय : अधिसभा निवडणूक २०१५**
**नोंदणीकृत पदवीधर (Registered graduate) म्हणून नांव नोंदणीबाबत**

सर्व संबंधितांच्या माहितीसाठी कळविण्यात येते की, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ च्या कलम ९९ मधील तरतुदीनुसार पदवीधारकांकडून नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदणीसाठी माहिती विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर Online पद्धतीने, विहित केलेल्या नमुना अर्ज Appendix-1 मध्ये **दिनांक ८.४.२०१५ ते ७.५.२०१५** या कालावधीत मागविण्यात येत आहे. Online पद्धतीने अर्ज भरतांना दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे. Online अर्जाची Print घेऊन त्या अर्जासोबत खालील प्रमाणे आवश्यक दस्ताऐवजांच्या छायांकित प्रती आणि नोंदणी शुल्क रू. २५/- (अक्षरी रुपये पंचवीस फक्त), कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे नावे राष्ट्रीयकृत बॅंकेचा दर्शनी धनाकर्ष (Demand Draft) अथवा विद्यापीठाच्या काऊन्टरवर रोखीने भरून, पैसे भरलेल्या पावतीचा एक भाग जोडून असे अर्ज, **गुरूवार, दिनांक ७.५.२०१५ पर्यंत** कार्यालयीन वेळेत विद्यापीठाच्या केंद्रीय आवक शाखेत स्वीकारण्यात येतील.

a) A true copy of the parchment of his degree attested by the Principal of a college or Gazetted Officer.

OR

b) A certificate from the Registrar of the university conferring the degree to the effect that he has been admitted the Degree.

१) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ कार्यक्षेत्रात (अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा आणि वाशिम जिल्हा) वास्तव्यास असलेल्या, अमरावती विद्यापीठाची स्थापना होण्यापूर्वी नागपूर विद्यापीठाचे पदवीधर असलेल्या व्यक्ती ज्यांनी नागपूर विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्र धारण केलेले आहे अशा व्यक्ती अमरावती विद्यापीठात नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदविण्यास पात्र आहेत. त्यानुसार असे जे नागपूर विद्यापीठाचे पदवीधर नांव नोंदवू इच्छित असतील त्यांनी या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील आपल्या वास्तव्याचे पुराव्यासह, (शिधापत्रिका, मतदान ओळखपत्र, मालमत्तेची कागदपत्र, इत्यादी) पदवी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत आणि नागपूर विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांच्या खंडातून (Volume) त्यांचे नांव वगळल्याचे अथवा नाव नसल्याबाबतचे नागपूर विद्यापीठाच्या कुलसचिवांचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावेत.

२) यापूर्वी ज्या पदवीधारकांची विद्यापीठाने तयार केलेल्या पंजीकृत पदवीधरांचे Volume-I, II, III, IV & V मध्ये पंजीकृत पदवीधर म्हणून नोंदणी झालेली असेल अशा पंजीकृत पदवीधरांनी पुन्ह नव्याने नोंदणी करण्याची आवश्यकता नाही.

३) कृषी विद्यापीठाच्या पदवीधरांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदणीसाठी अर्ज करू नये.

४) विहित मुदतीनंतर आलेले तसेच अपूर्ण अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत तद्वतच यासंदर्भात संबंधित अर्जदारासोबत कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

स्वा/-
(दिनेशकुमार जोशी)
कुलसचिव तथा निवडणूक निर्वाचन अधिकारी

******

SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART - TWO

(असाधारण)

मंगळवार, दिनांक ०७ एप्रील, २०१५

## अधिसूचना

क्रमांक : ३१/२०१५ दिनांक ०७/०४/२०१५

**विषय : दिनांक ०४, ०५/०४/२०१५ रोजीच्या पुढे ढकलण्यात आलेल्या विद्यापीठ परीक्षा रविवार, दिनांक १९/०४/२०१५ ला घेण्याबाबत.**

**संदर्भ : १) अधिसूचना क्रमांक २८/२०१५, दिनांक २४/०३/२०१५**
**२) अधिसूचना क्रमांक २९/२०१५, दिनांक २७/०३/२०१५**

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता सूचित करण्यात येते की, उपरोक्त संदर्भांकित अधिसुचना क्रमांक १ व २ नुसार पुढे ढकलण्यात आलेल्या दिनांक ०४, ०५/०४/२०१५ च्या विद्यापीठाच्या त्या दिवशीच्या सर्व परीक्षा **रविवार, दिनांक १९/०४/२०१५ ला पूर्वीच्याच परीक्षा केंद्रांवर व पूर्वीच्याच वेळेत** घेण्यात येतील. कृपया उपरोक्त बदलाची सर्व प्राचार्य, केंद्राधिकारी, सहकेंद्राधिकारी, विद्यार्थी व पालकांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

आदेशान्वये

स्वा/-
( प्राचार्य डॉ.जे. डी. वडते )
परीक्षा नियंत्रक
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

******